# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४८३ दिनांक ३०.०५.२०२०

१. फिर्यादी पुरुष वय-४४ वर्ष व्यवसाय-नोकरी रा.शहापुर ता.शहापुर जि.ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि. २३/०५/२०२० रोजी १२.३० ते २५/०५/२०२० रोजी ०८.१५ वाजता दरम्यान आरोपीत हे पोल्ट्री फार्म चे मालक असुन त्यांनी गोंदरेज टायसन फुड्स कंपनी लि.विक्रोळी मुंबई यांचे कडुन परत त्यास कंपनीस देण्याचे लेखी करारान्वये कंपणीने ४५८८ बॉयलर पक्षी व ३३६ पशु खादय गोणी असे विश्वासाने दिले होते. आरोपीत याने कंपणीने दिलेले ४१७९ पक्षी त्यांची रक्कम ७,०२,०७२/- रुपये व ५७ गोणी पशुखादय प्रत्येक गोणी ५० किलो ग्रॅम वजनाची त्याची किमंत ८५,५००/-रुपये अशी एकुण ७,८७,५७२/- रुपयाचा पशुखादय माल व बॉयलर पक्षी यांची परस्पर विल्हेवाट लावुन फिर्यादीचे कंपनीची फसवणुक केली. सदर बाबत फिर्यादी हे आरोपीत यास विचारणेस गेले असता त्याना शिवीगाळी दमदाटी करुन धमकी दिली म्हणुन <u>**वाडा पोलीस ठाणे**</u> गु.र.नं. I १३१/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४०७,४२०,५०४,५०६ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

२. फिर्यादी पुरुष वय- ३६ वर्षे, धंदा- टेलर, रा. नालासोपारा पूर्व, ता. वसई, जि. पालघर, दि. १५/०५/२०२० रोजी सकाळी ०८:०० वा. सुमारास आरोपीत नामे व त्याचा साथीदार अनोळखी इसम यांनी आपापासांत संगनमत करुन शासनामार्फत श्रमिक ट्रेन मोफत सोडण्यात आलेली हे माहित असताना कपटाने जौनपूरला फिर्यादीची पत्नी व दोन लहान मुले तसेच त्यांचे शेजारी राहणारे साक्षीदार व त्याचे परिवाराला सदर ट्रेनने प्रवास करण्यासाठी प्रत्येकी १०००/- रु असे फिर्यादीकडुन ३०००/- रु. व साक्षीदार याचेकडुन ४०००/- रुपये असे एकूण ७ जणांचे ७०००/- रु. रोख रक्कम घेवुन फसवणूक केली आहे म्हणून <u>**तुळींज पोलीस ठाणे**</u> गु.र.नं. I ५४४/२०२० भा.दं.वि.सं.कलम ४२०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

३. फिर्यादी महिला वय ४१ वर्षे, व्यवसाय भाजी विक्री, रा. नालासोपारा पुर्व ता वसई जि पालघर , यांनी फिर्याद दिली की, दि.२४/०५/२०२० रोजी १८-०० वाजताच्या सुमारास यातील पिडीत मुलगी ही राहत्या घराच्या पाठी- मागे कपडे आणण्यासाठी गेली असता आरोपीत १ व २ हे तिच्याकडे पाहुन शिटी वाजुन गाणी म्हणु लागले म्हणुन पिढीत मुलगी ही त्यांना ये कुत्र्या असे म्हणाली तेव्हा त्या दोघांनी तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असा हात पकडला तेव्हा पिढीत मुलगी ओरडल्याने सदर ठिकाणी फिर्यादी, फिर्यादी चे पती, व त्यांची दोन मुले आले तेव्हा आरोपीत १ ते ६ यांनी मिळुन फिर्यादी, फिर्यादी यांचे पती, व पिढीत मुलगी व दोन्ही मुलांना शिवीगाळी करुन ठोश्या-बुक्यांने व लाकडी दांढक्याने पायावर, पोटावर, व डोक्यात मारहाण करुन दुखापत केली म्हणुन <u>**तुळींज पोलीस ठाणे**</u> गु.र.नं. I ५४५/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३५४, ३२४, १४३, १४७, १४८, १४९ सह पोस्को ८,१२ गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

४. फिर्यादी पोशि/१०२ सोमनाथ गोरक्ष घनवट ,वय- २७ वर्षे, व्यवसाय नोकरी, नेम- केळवा सागरी पोलिस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि. २९/०५/२०२० रोजी १९.३० वाजताचे सुमारास फिर्यादी कोवीड १९ विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव होवु नये या अनुषंगाने कर्तव्य बजावत असताना सफाळेकडुन उसरणीकडे मोटार वाहन ऑटो रिक्षा क्र. एम एच ४८ एएक्स ८४२२ चालकास थाबवुन नाव गाव विचारले असता आरोपीतन १ याने त्याचे नाव सागुन फीर्यादी यांनी विचारपुस केली असता त्या गोष्टीचा मनात राग धरुन आरोपीत क्रमांक १ याने रीक्षातुन उतरुन तु मला विचारु शकत नाही, मी काहीही करीन आणि कुठेही जाईन. माझी स्वतः ची गाडी आहे मला कोणाच्याही परवाणगीची गरज नाही असे बोलुन संगमताने आरोपीतन १ व २ असे दोघेही रीक्षातुन खाली उतरुन आरोपीतन १ याने जवळ येवुन तुला दाखवतो, तुझी नोकरी घालवतो असे बोलुन शिवीगाळी दमदाटी करुन शर्टाची गच्ची पकडुन शर्टाचे २ बटने व नेमप्लेट तोडुन धकाबुकी करुन हाताने मारहाण केली तसेच आरोपीत क्रमांक २ याने ही धकाबुक्की करुन शिवीगाळी दमदाटी करुन हयगयीची कृतीकरुन संगनमताने आरोपीतन १ व २ याने सरकारी कामकाजात अडथळा निर्माण केला तसेच मा. जिल्हा दडाधिकारी सो पालघर साचे मनाई आदेशाचे उल्लघन केले म्हनुन **केळवा पोलीस ठाणे** गु.र.नं. I २६/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३५३, ३३२, २६९, ५०४, ५०६, १८८, ३४ सह आपती व्यवस्थापन कायदा २००५ चे ५१ (ब) प्रमाणे, साथीचे रोग अधिनियम १८९७ कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक ३०/०५/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

५. फिर्यादी महिला वय-३९ वर्षे, धंदा-गृहिणी ,रा- पालघर पुर्व ता.जि. पालघर यांनी फिर्याद दिली की, दि.२८/०५/२०२० रोजी रात्रो २२.३० ते २९/०५/२०२० रोजी ०८.३० वाजता आरोपीत यांने फिर्यादी यांच्या समंती शिवाय फिर्यादी यांच्या आईच्या घरी ठेवलेली दागिन्याची पर्समधुन ग्रिल नसलेल्या उघडया खिडकीवाटे आत प्रवेश करुन ९५,८००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त माल चोरी करुन नेला म्हणून **पालघर पोलीस ठाणे** गु.र.नं. I १७२/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

६. फिर्यादी पो.शि./३८२ आकाश नागो छानवाल, नेम-अर्नाळा सागरी पोलीस ठाणे यांनी फिर्याद दिली की, दि. २९/०५/२०२० रोजी १०.३० वा वाजताचे सुमारास आरोपीत क्रमांक १ ते ७ यांचे सांगणेवरुन अर्नाळा पार नाका, विरार प. या प्रतिबंधीत (कंटेनमेंट झोन) क्षेत्रात आणून मा.जिल्हाधिकारी, जि. पालघर यांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केले. म्हणून **अर्नाळा पोलीस ठाणे** गु.र.नं. II २१६/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८, २६९, २७० व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ (ब) प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

७. फिर्यादी पोशि/६९४ प्रफुल्ल शिवाजी सरगर नेम-वसई पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि.२९/०५/२०२० रोजी ११.०० ते १७.३० वाजताचे सुमारास संपुर्ण जगात कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव असून शासनाकडून सतर्कतेच्या सुचना दिलेल्या असून योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय पालघर यांचेकडील क्र.गृह/का-१/टे-३/मनाई आदेश/एसआर-२४/२०२० दिनांक १७/०५/२०२० अन्वये व क्र/जिआ.व्यपालघर/ कोरोना विषाणु/सुधारीत मार्गदर्शक सुचना/ आदेश/कावि-११९२/२० दिनांक २१/०५/२०२० अन्वये. पालघर जिल्हयात फौजदारी प्रक्रीया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे दिनांक १७/०५/२०२० ते दिनांक ३१/०५/२०२० पावेतो मनाई आदेश लागु केलेला आहे. यातील आरोपी

यांनी वसई तहसील कार्यालय येथे हक्काग्रह आंदोलन करुन घोषणबाजी, गाणी बोलुन,मा. जिल्हाधीकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर यांचेकडील मनाई आदेशाचा भंग केला, म्हणुन **वसई पोलीस ठाणे** गु.र.नं. ાા २४३/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.

८. फिर्यादी पोशि/४३४ योगेश नंदलाल छानवाल वय २५ वर्षे नेम.सातपाटी पोलीस ठाणे, यांनी फिर्याद दिली की, दि. २९.०५.२०२० रोजी १९.३० वाजताचे सुमारास आरोपीत यांनी स्वःताचे फायदया करीता गैरकायदा गावठी हातभट्टीची दारू व दारू तयार करण्याची साधने स्वःताचे ताब्यात बाळगले असताना मिळुन आले. तसेच करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोणतेही सहकार्य न करता मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर यांनी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन केले म्हणुन **सातपाटी पोलीस ठाणे** गु.र.नं. ાા ४४/२०२० भा.दं.वि.सं.कलम १८८, २६९ , आपत्ती व्यवस्थापन २००५ चे कलम ५१(ब), ३४ , महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५(क),(फ),(ई) प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे.